**नियमित दिवाणी दावा क्र.७१/२०२४**
**मारुती बारक्या रांबाडे**
**वि.**
**राजेंद्र तुकाराम रांबाडे**

## <u>निशाणी ३८ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्यामुळे दि.१३.०३.२०२५ रोजी नि.०१ वरील आदेशाने प्रस्तुतचा प्रतिदावा विनाकैफियत चालविण्यात आला. तो आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, माहीतीगार वकीलांना भेटून प्रतिदाव्याचे कामी म्हणणे दाखल करणे आवश्यक होते. परंतु, वादी यांना त्यांच्या माहीतगार वकिलांना भेटून सदर कामी आवश्यक ती माहीती व कागदपत्रे न देता अलीकडेच सदर कागपत्रे उपलब्ध झाल्यानंतर त्यासंदर्भातील माहीत वकीलांना दिली. वादी यांची कैफियत अभिलेखावर न आल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असल्याने कैफियत दाखल करण्यास परवानगी साठी विनंती केली आहे.

**२.** सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ यांनी नि.४० कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादींनी सुमारे १ वर्षाचा कालावधी घेतलेला आहे. दाव्यातील वादी यांना खरी परिस्थिती स्वीकारायची नाही. खोटी कहानी बनवून ते दावा चालवण्यास लांबट लावत आहेत. प्रतिवादी क्र.१ मुंबईवरुन येतात ते वयोवृध्द आहेत. सध्या ते आजारी असतात या वरील सर्व कारणाचा विचार करता अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा अशी नम्र विनंती केली आहे.

**३.** येणे प्रमाणे अर्ज, म्हणणे आणि युक्तीवाद पाहता वादीने प्रस्तुतचा दावा शांततामय कब्जा व वहिवाटीसाठी व कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा निमा्रण करुन नये अशा निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी विरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे. दि.१३.०३.२०२५ रोजी नि.१ वरील आदेशाने प्रस्तुतचा प्रतिदावा वादी विरुध्द विनाकैफियत चालविण्यात आला आहे.

सदर वादीने या अर्जासोबत त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले असून प्रतिवादीची प्रतिदावा व त्यातील कथने नाकारली आहेत. त्यामुळे दाव्याचा व प्रतिदाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यासाठी सदर वादीची कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. झालेल्या विलंबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील कलम ३५ प्रमाणे खर्च आकारुन कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचे कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेतली न गेल्यास त्यांना बचावाची संधी नाकारल्यासारखी होणार आहे. त्यामुळे वादीची कैफियत अभिलेखावर घेणे विधीसंगत वाटते. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

**१.** वादी यांचा नि.३८ कडील अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** वादीनी प्रतिवादी क्र.१ यांना ₹४००/- मात्र खर्च दिल्यानंतर दि.१३.०३.२०२५ रोजीचा नि.०१ वरील आदेश रद्द करून कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

सही/-

(वाय.सी. पाटील )

दिनांक -०६/०२/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,चिपळूण.

## <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| आदेश घोषीत दिनांक | ०६.०२.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०६.०२.२०२६ |
| आदेश अपलोड केलेले दिनांक | ०९.०२.२०२६ |